भक्त केशवाचे आले । दूत यमाचे पळाले ।
भक्त हरीचे चालिले । हाती हरिनामाचे भाले ।।




# दिल्लीला नाही, महाराष्ट्रातच विठ्ठलाची सेवा करायची आहे : अमृता फडणवीस

## त्यांनी वारीत सहभागी व्हावे म्हणजे आंदोलनाचा गैरफायदा घेणाऱ्यांच्या विचारांचे प्रदूषण संपेल : मुख्यमंत्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** आम्हाला दिल्लीला नव्हे, महाराष्ट्रातच राहायचे आहे, या अमृता फडणवीस यांच्या वक्तव्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रात जाण्याच्या चर्चेला तूर्त पूर्णविराम मिळाला. आम्ही कुठेही असू, विठ्ठलाची सेवा करीत राहणार असल्याचे फडणवीस म्हणाल्या.

पंढरपूर येथे आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नीही अमृता याही आल्या आहेत. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, आपले सरकार पेपरफुटीवर कडक कायदा आणत आहे. प्रत्येक व्यक्ती कलाकार यांना आपले विचार व्यक्त करण्याचा अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले. दोन ठाकरे इतके दिवस वेगळे होते. आता एकत्र येतात, ही चांगली गोष्ट असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

पंढरपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले, लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. लोकशाही आणि संविधानाचा सन्मान प्रत्येकाने राखला पाहिजे. जी मंडळी आंदोलनाचा गैरफायदा घेत आहेत, त्यांना वारीत सहभागी होण्याची संधी मिळावी. म्हणजे त्यांच्या विचारांचे प्रदूषण संपेल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले, विद्यार्थी आंदोलनावर चर्चा सुरू झाली आहे आजही चर्चा झालीय. सोनम वांगचूक यांनी उपोषण सोडले.

चर्चेतून मार्ग निघत असतो. देशाच्या पंतप्रधानांनी एक पाऊल पुढे टाकून पेपरफुटीविरोधात कडक कायदा करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. विधान परिषद निवडणुकीचा मुद्दा उपस्थित केल्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी माजी आमदार प्रशांत परिचारक यांचा योग्य सन्मान केला जाईल, असे स्पष्ट केले.



आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपुरात आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हाती टाळ घेऊन हरिनामामध्ये तल्लीन झाले. त्यांच्यासमवेत पत्नी अमृता फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांच्यासह वारकरी.

### कॉरिडॉरमुळे ५० लाख वारकऱ्यांची सोय होईल

पंढरपुरात येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत असल्याने हा आराखडा करायचा आहे. कॉरिडॉर झाल्यावर पंढरपूर मध्ये ४० ते ५० लाख वारकरी बसू शकतात. पंढरपुरात आलेल्या वारकऱ्यांची सोय होईल असे फडणवीस यांनी सांगितले.

**कर्जमुक्तीचे प्रमाणपत्र** सात शेतकऱ्यांना प्रदान

**जागतिक तीर्थक्षेत्र..** कॉरिडॉरसाठी १०० टक्के लोकांचे समाधान

**भीमा नदी..** ३५-४० टीएमसी पाणी उजनीत आणू.

**चंद्रभागा नदी..** पूलकम बंधाऱ्यात परिवर्तित

**३१ ऑगस्टपर्यंत** १७ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम /कर्जमुक्त

**प्रशांत परिचारक** यांचा योग्य सन्मान

**पंढरपूर-लोणंद,** पंढरपूर-विजापूर रेल्वेसाठी प्रयत्न

# कर्जमाफीच्या दुसऱ्या यादीत १ हजार ७८ गावचे शेतकरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची सोलापूर जिल्ह्यातील १,०७८ गावांतील शेतकऱ्यांची दुसरी यादी आली असून, फार्मर आयडी असेल तरच कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याने नसलेल्यांनी तत्काळ ॲग्रीस्टॅक काढून घेण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी केले आहे.

२२ जुलै २०२६ रोजी जिल्हा मध्यवर्ती बँकेची २१ शेतकऱ्यांची यादी आली होती. शुक्रवारी जिल्हा बँकेची १,०७८ शेतकऱ्यांची यादी प्राप्त झाली आहे. अक्कलकोट : १२६, उत्तर सोलापूर : ५२, करमाळा :१२०, दक्षिण सोलापूर : ८७, पंढरपूर : ९७, बार्शी : १२३, मंगळवेढा : ७६, माढा : ११४, माळशिरस : १०६, मोहोळ : ९४, सांगोला : ८२ अशी एकूण १,०७८ शेतकऱ्यांची कर्जमाफीची यादी शुक्रवारी उशिरा आली.

कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी यादीमधील सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपले सरकार केंद्र, सीएसी केंद्रात जाऊन आधार प्रमाणीकरण करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया ही विनामूल्य असून, कोणत्याही केंद्रावर रक्कम अदा करू नये, असे पवार यांनी सांगितले.

Rashtriya Charitable Trust's
**RASHTRIYA AYURVED COLLEGE AND RESEARCH INSTITUTE**
Gat No. 14, Jaitapur Road, Hatnoor Tq. Kannad Dist. Chh. Sambhajinagar.
Institute ID: AYU0891, College Code: 03391

**WALK IN INTERVIEW**

Applications are invited for filling up the following posts in the above said college/institute.

| Sr. No. | Department | Professor | Associate Prof. (Reader) | Assistant Prof. (Lecturer) |
|---|---|---|---|---|
| | Principal | | 1 (Open) | |
| 1 | Ayurved Samhita & Siddhant | 1 (Open) | 1 (Open) | 2 (Open) |
| 2 | Sanskrit | – | – | 1 (SC) |
| 3 | Rachana Sharir | 1 (Open) | 1 (Open) | 1 (Open) |
| 4 | Kriya Sharir | 1 (Open) | 1 (Open) | 1 (Open) |

Date of Interview : As per schedule (to be intimated)
Address for Interview : Rashtriya Ayurved College and Research Institute
Gat No. 14, Jaitapur Road, Hatnoor Tq. Kannad Dist. Chh. Sambhajinagar
Share your resume at E-mail ID : rashtriyacollege2009@gmail.com

● INSTRUCTIONS ●
● Eligible candidates can apply for the above posts. ● Candidates must report to the college office by 10:00 AM on the date of interview with all necessary documents. ● No TA/DA or any other allowance are applicable for candidates.

Secretary Rashtriya Charitable Trust

# भीमा खोऱ्यातील ८ धरणांतून ७१ हजार क्युसेक विसर्ग

**टेंभुर्णी :** भीमा खोऱ्यातील ८ धरणांतून विसर्ग सोडण्यात येत असल्याने उजनी धरणाच्या पाणी पातळीत गेल्या २४ तासांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. रात्री ९ वाजता पाणी पातळी ६५ टक्के झाली होती. गेल्या २४ तासांत १५ टक्केपर्यंत वाढ झाली आहे. दौंड येथील विसर्गात पुढील २४ तासांत आणखी वाढ होणार आहे.

भीमा खोऱ्यातील ८ धरणांतून शुक्रवारी ७१ हजार ४४४ क्युसेक विसर्ग सोडण्यात येत आहे. यामुळे उजनी धरणाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. दौंड येथून ३६ हजार २०० क्युसेक विसर्ग उजनीत मिसळत असून, शनिवारी उजनीची पाणी पातळी ७५ टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. सध्या धरणात एकूण ९८ टीएमसी पाणीसाठा असून, ३४.३५ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. उजनी १०० टक्के भरण्यासाठी आणखी १७ ते १८ टीएमसी पाणीसाठ्याची गरज आहे.

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (EWS) अर्जदारांकरिता शहरातील विविध ठिकाणच्या सदनिकांच्या विक्रीसाठी
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.
अर्ज भरण्याकरिता https://housing.chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

प्रधान मंत्री आवास योजना Pradhan Mantri Awas Yojana

**अर्जदाराची नोंदणी व स्वीकृतीचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ऑनलाइन अर्जाची नोंदणी व अर्ज सादर करण्याची तारीख व वेळ | 23/07/2026 दुपारी 12.00 वा. पासून |
| ऑनलाइन अर्जासाठी नोंदणीची शेवटची तारीख व वेळ | 06/08/2026 रोजी रात्री 11.59 वा. पर्यंत |
| ऑनलाइन पेमेंट स्वीकृती अंतिम दिनांक | 10/08/2026 रोजी रात्री 11.59 वा. पर्यंत |
| बँकेत RTGS/NEFT द्वारे रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक | 10/08/2026 पर्यंत संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |

अर्जाची किंमत रु. 600/- +GST 108 एकूण रु. 708/- विनापरतावा

| अ. क्र. | योजनेचे नाव व गट क्र. | सदनिकेची अंदाजित किंमत (रु.) | चटई क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| 1 | पडेगाव गट क्र. 69 | 9,56,332/- | 29.98 |
| 2 | तीसगाव गट क्र. 225/1 | 9,26,382/- | 29.98 |
| 3 | तीसगाव गट क्र. 227/1 | 9,44,370/- | 29.98 |

स्वाक्षरित/-
**अमोल येडगे (भाप्रसे)**
आयुक्त,
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

# पालकांनी संपत्तीपेक्षा संततीला महत्त्व द्यावे : इंदोरीकर महाराज

लोकमत न्यूज नेटवर्क



**अक्कलकोट :** सध्याची पिढी व्यसन, मोबाईलचा अतिवापर व इतर चुकीच्या गोष्टींमुळे बरबाद झाली आहे परंतु यामध्ये पालकांची भूमिका महत्त्वाची आहे. पालकांनी संपत्तीपेक्षा आपल्या संततीला संस्कार देणे गरजेचे आहे. पालकांच्या चुकीमुळे तरुणपिढीचा बरबाद होत चालल्याचे परखड मत निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर यांनी व्यक्त केले.

आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला अन्नछत्र मंडळातील कीर्तनास हाऊसफुल्ल गर्दी झालेली होती. श्रोतेगण कीर्तन व प्रबोधनाने मंत्रमुग्ध झाले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर व न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले,अनुया संदीप फुगे,माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे,स्वाती निकम, तेजस्विनीराजे भोसले आदी उपस्थित होते.

# आरबीसी इंग्लिश स्कूलमध्ये बालदिंडी

**मंगळवेढा :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त तांडोर-सिद्धापूर येथील आरबीसी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये चिमुकल्यांची दिंडी उत्साहात निघाली. दिंडीमुळे संपूर्ण गाव विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेले.

सरपंच निर्मलाताई पुजारी यांच्या हस्ते दिंडीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर 'ज्ञानोबा-तुकाराम', 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' आणि 'विठ्ठल... विठ्ठल...' या अखंड नामघोषात गावातील प्रमुख मार्गांवरून दिंडी काढण्यात आली. दिंडीतील रिंगण सोहळ्याने उपस्थितांची विशेष दाद मिळवली. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत सावता माळी आणि संत गोरा कुंभार यांच्या वेशभूषेतून संतपरंपरेचा प्रभावी संदेश दिला.

यावेळी संस्थापक गजानन पाटील, सरपंच निर्मलाताई पुजारी, उपसरपंच सचिन चौगुले, संस्थेच्या सचिव मीनाक्षीताई पाटील, प्राचार्य प्रियांका पाटील, उपप्राचार्य प्रिया धनवे, पर्यवेक्षक माधुरी कोरे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी विशेष परिश्रम घेतले.




**बँक ऑफ इंडिया**
नातं बँकींग पलिकडचं...

**वसुली विभाग – सोलापूर आंचलिक कार्यालय**
सह्याद्री शॉपिंग सेंटर, जुना एम्प्लॉयमेंट चौक,
सोलापूर –४१३००१. फोन : ०२१७२–२३१९४७६
इमेल : Solapur.ARD@bankofindia.bank.in

रुल ८(६)

**स्थावर मालमत्तेचा विक्री सुचना**

ई लिलाव द्वारे स्थावर मिळकतींची विक्री नोटीस : सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरीटी इन्टरेस्ट ॲक्ट २००२, सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल २००२ मधील तरतुद कलम 8(6)

**ई लिलाव दिनांक व वेळ : दि.२५ ऑगस्ट २०२६ स.११ ते सायं.५ पर्यंत (भारतीय प्रमाण वेळेनुसार)**

तमाम नागरिकांना, विशेषत: कर्जदार व जामीनदार यांना सुचना देण्यात येते कि कर्जदार/जामीनदार यांच्याकडुन येणे रक्कम बाकी पोटी बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी यांनी नमुद स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला असुन सदर मालमत्तांचा ई–लिलाव द्वारे ''जेथे आहे तेथे, जसे आहे तसे, जेवढे आहे तेवढे '' या तत्वावर दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी विक्रीस काढली आहे ज्याचा तपशील खालील प्रमाणे आहे

| अ. क्र. | प्रकार | जागेचे तपशिल | शाखा कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव | मालमत्तेचे सविस्तर वर्णन | राखीव किंमत रु./ अनामत बयाणा रक्कम | एकुण येणे बाकी + व्याज + इतर खर्च | प्रोपर्टी इनस्पेकशन तारीख/वेळ प्राधिकृत अधिकारी नांव व मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | कमर्शियल शॉप (प्रत्यक्ष ताबा) | मु.गुळपोळी, ता.बार्शी, सोलापूर–४१३४०३ | **पानगांव शाखा** श्री. बापुराव ब्रह्मदेव जिरगे (कर्जदार) श्री.ब्रह्मदेव विष्णु जिरगे (जामीनदार) सौ.भारती ब्रह्मदेव जिरगे (जामीनदार) | ग्राम पंचायत मिळकत नं.१३९/बी, गुळपोळी, ता.बार्शी, जि.सोलापूर–४१३४०३ येथील श्री.ब्रह्मदेव विष्णु जिरगे आणि सौ.भारती ब्रह्मदेव जिरगे यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण प्लॉट क्षेत्रफळ ७५.७१ स्क्वे.मी एकुण बिल्टअप क्षेत्रफळ ६५.०३ स्क्वे.मी | रु.१३.२४ लाख इएमडी रु.१,३२,४००/– | रु.२५.७८ लाख + व्याज व इतर खर्च दि.२०.०३.२०२४ पासुन | तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. राजा रमण (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2318994; मो : 7639904428 Solapur.ARD@bankofindia.bank.in |
| ०२. | घर (प्रतिकात्मक ताबा) | मित्र नगर, दहीटणे रोड, शेळगी–४१३००४ | **सुभाष चौक शाखा** श्री. संभाजी दगडु निकम (कर्जदार) सौ.मिरा संभाजी निकम (जामीनदार) | प्लॉट नं.२४, नवीन सर्व्हे नं.१८/२ए, मित्र नगर, ॲग्रो इंडस्ट्रीज जवळ, दहिटणे रोड, शेळगी, सोलापूर–४१३००४ येथील सोलापूर म्युनसीपल कॉर्पोरेशन हद्दीतील सौ.मीरा संभाजी निकम यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण प्लॉट क्षेत्रफळ ९२.९३ स्क्वे.मी एकुण बिल्टअप क्षेत्रफळ ८४.७९ स्क्वे.मी | रु.२५.८४ लाख इएमडी रु.२,५८,४००/– | रु.१५.६१ लाख + व्याज व इतर खर्च दि.२२.०२.२०२६ पासुन | तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. श्रवणकुमार लघुम (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2318994; मो : 9390106753 Latur.Solapur@bankofindia.bank.in |
| ०३. | फ्लॅट (प्रतिकात्मक ताबा) | काजल नगर, मजरेवाडी, सोलापूर–४१३००४ | **सुभाष चौक शाखा** श्री. अफसर उसमान इनामदार (कर्जदार) सौ.शाहीन अफसर इनामदार (सह–कर्जदार) | फ्लॅट नं.१०२, पहिला मजला, क्रिस्टल टॉवर अपार्टमेंट, प्लॉट नं.०३ ची पश्चिम बाजुस, जुना सर्व्हे नं.२८३/१/३, नवीन सर्व्हे नं.४/१/३, काजल नगर, मजरेवाडी, सोलापूर–४१३००४ येथील श्री.अफसर उस्मान इनामदार यांच्या संयुक्त मालकीची जागा व इतर साहित्य एकुण कार्पेट क्षेत्रफळ ६३.११ स्क्वे.मी | रु.३९.१६ लाख इएमडी रु.३,९१,६००/– | रु.१६.०७ लाख + व्याज व इतर खर्च दि.२९.०६.२०२५ पासुन | तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. श्रवणकुमार लघुम (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2318994; मो : 9390106753 Latur.Solapur@bankofindia.bank.in |
| ०४. | घर (प्रतिकात्मक ताबा) | दमाणी नगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर–४१३००१ | **रेल्वे लाईन्स शाखा** श्री.बसवराज सिध्दराम नवले (कर्जदार) श्री.आनंद सिद्राम नवले (सह–कर्जदार) श्री.अरविंद सिध्दराम नवले (सह–कर्जदार) सौ.पार्वती अरविंद नवले (सह–कर्जदार) श्री. दयानंद सिद्राम नवले (सह–कर्जदार) | टीपी नं.०४, सिटीएस नं.८४२६–ए/१, फायनल प्लॉट नं.१५९+१६०/३८८, दमाणी नगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर महानगरपालिका हद्दीतील, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर–४१३००१ येथील श्री.बसवराज सिध्दराम नवले, श्री.आनंद सिद्राम नवले, श्री.अरविंद सिध्दराम नवले, श्री.दयानंद सिद्राम नवले यांच्या संयुक्त मालकीची जागा व इतर साहित्य एकुण प्लॉट क्षेत्रफळ २८७.७० स्क्वे.मी | रु.१४२.०० लाख इएमडी रु.१४,२०,०००/– | रु.८६.६३ लाख + व्याज व इतर खर्च दि.०९.०५.२०२६ पासुन | तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. मल्लावारापु प्रणीथ (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2318994; मो : 9603661666 Railwayline.Solapur@bankofindia.bank.in |
| ०५. | फ्लॅट (प्रत्यक्ष ताबा) | न्यु पाच्छा पेठ, सोलापूर–४१३००६ | **होटगी रोड शाखा** श्री. अशोक अंबाजी अल्ली (कर्जदार) | फ्लॅट नं.५ व ६, दुसरा मजला, टी.पी.१, सिटीएस नं. १०३८८, प्लॉट नं.३४/५बी, सब प्लॉट नं.२४/२७/३, अश्विनी टॉवर, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर, ता.व जि.सोलापूर –४१३००६ येथील जागा व इतर साहित्य एकुण प्लॉट क्षेत्रफळ १६७.९७ स्क्वे.मी | रु.३७.२२ लाख इएमडी रु.३,७२,२००/– | रु.२३.०७ लाख + व्याज व इतर खर्च दि.२९.०५.२०१८ पासुन | तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. संजीवकुमार श्रीवास्तवा (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2600829; मो :7903960760 hotgiroad.solapur@bankofindia.bank.in |
| ०६. | फ्लॅट (प्रत्यक्ष ताबा) | जय प्लाझा, होटगी रोड, सोलापूर–४१३००४ | **होटगी रोड शाखा** श्री. विनीत मलय्या मठपती (कर्जदार) | फ्लॅट नं.५०३, पाचवा मजला, न्यु सर्व्हे नं.६/५बी, ६/६, ६/७/ए, 'जय प्लाझा' चौगुले पार्क, युनायटेड ग्रीन्स जवळ, होटगी रोड, सोलापूर–४१३००४ येथील श्री.विनीत मलय्या मठपती यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण प्लॉट क्षेत्रफळ ५९.५७ स्क्वे.मी | रु.२३.२३ लाख इएमडी रु.२,३२,३००/– | रु.१९.८९ लाख + व्याज व इतर खर्च दि.२९.०१.२०१४ पासुन | तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. संजीवकुमार श्रीवास्तवा (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2600829; मो :7903960760 hotgiroad.solapur@bankofindia.bank.in |
| ०७. | फ्लॅट (प्रत्यक्ष ताबा) | राघवेंद्र नगर, विजापूर रोड, सोलापूर–४१३००६ | **होटगी रोड शाखा** श्री. नेताजी अर्जुन नारायणकर (कर्जदार) सौ.सिमा नेताजी नारायणकर (सह–कर्जदार) | फ्लॅट नं.२०४, दुसरा मजला, ऋषी रेसीडेंसी प्लॉट नं.२१२, जुना सर्व्हे नं. ३४२, नवीन सर्व्हे नं.१०६ (भाग) राघवेंद्र नगर, विजापूर रोड, सोलापूर–४१३००६ येथील श्री.नेताजी अर्जुन नारायणकर यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण कार्पेट क्षेत्रफळ ४०.७५ स्क्वे.मी | रु.१६.४९ लाख इएमडी रु.१,६४,९००/– | रु.१३.३९ लाख + व्याज व इतर खर्च दि.२७.०२.२०२३ पासुन | तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. संजीवकुमार श्रीवास्तवा (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2600829; मो :7903960760 hotgiroad.solapur@bankofindia.bank.in |
| ०८. | फ्लॅट (प्रत्यक्ष ताबा) | पाच्छा पेठ, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर–४१३००३ | **सदर बझार शाखा** सौ.अश्विनी अप्पासाहेब आडके (कर्जदार) | फ्लॅट नं.२०१, दुसरा मजला, जयलक्ष्मी रेसीडेंसी–४, फायनल प्लॉट नं.३५, सब प्लॉट नं.१३४, सि.टी.एस.नं. १०३८९/ए, न्यु पाच्छा पेठ, जि.उत्तर सोलापूर, सोलापूर–४१३००३ येथील सौ.अश्विनी अप्पासाहेब आडके यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण कार्पेट क्षेत्रफळ ५०.७३ स्क्वे.मी | रु.१६.२३ लाख इएमडी रु.१,६२,३००/– | रु.२०.४२ लाख + व्याज व इतर खर्च दि.२७.०७.२०१९ पासुन | तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. शांतप्पा सिध्दराम सलगर (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2315381; मो :9970216340 sadarbazar.solapur@bankofindia.bank.in |

सर्व नियम व अटी विषयी जाणुन घेण्यासाठी कृपया पुढील सांकेतीक स्थळांवर भेट द्या https://baanknet.com/eauction-psb/home Secured website i.e.https://bankofindia.bank.in//and/or https://BAANKNET.com इंग्रजी व मराठी जाहिरातींच्या मसुद्यात विसंगती आढळल्यास इंग्रजी जाहिरातीचा मसुदा अंतिम ग्राह्य धरला जाईल

Jhaveri

दि.२५.०७.२०२६
स्थळ : सोलापूर

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया